ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार तारीख ६ मार्च, १९६३ | अंक ५

## विविध माहिती

**तिबेटमधील लोकरीचें उत्पादन घटलें**—गेल्या जूनमध्यें भारत व चीन ह्यांच्यामधील व्यापारी संबंध संपुष्टांत आले. त्यानंतर तिबेटमधील लोकरीच्या उत्पादनांत बरीच घट झाल्याच्या वार्ता आहेत. उभयता देशांमधील व्यापारी संबंध तुटण्यापूर्वी तिबेटमध्यें दरसाल ६० हजार मण लोकर निर्माण होत असे. ह्या लोकरीला मुख्यतः भारताचेंच गिऱ्हाईक असे. भारताची मागणी बंद झाल्यानें लोकरीचें उत्पादन घटणें अनिवार्यच होतें.

**पृथ्वीच्या पोटांतील उष्णतेपासून वीज**—संयुक्त राष्ट्र-संघटनेतर्फे भरविण्यांत आलेल्या जागतिक शास्त्रीय परिषदेंत एका इटालियन शास्त्रज्ञानें अशी माहिती सांगितली कीं, पृथ्वीच्या पोटांतील उष्णतेपासून निर्माण करण्यांत येणारी वीज ही सर्वांत स्वस्त असेल. पृथ्वीवरील ज्वालामुखी असलेल्या प्रदेशांत अशी वीज निर्माण करता येईल. वीजनिर्मितीसाठीं लागणारी यंत्र-सामग्री नेहमींच्या यंत्रसामग्रीपेक्षा अधिक धोक्याची असणार नाहीं.

**विशाखापट्टम् येथील बोट कारखाना**—भारतांत आणीबाणीची परिस्थिति जाहीर झाल्यानंतर विशाखापट्टम् येथील बोटी बांधण्याच्या कारखान्यासाठीं लागणाऱ्या परदेशी चलनांत कपात करण्यांत आली होती. कारखान्याच्या संचालक मंडळानें ही कपात रद्द करण्याची विनंती भारत सरकारला केली आहे; त्याशिवाय आणखी २ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची मागणी करण्यांत आली आहे.

**पाणी तापविण्यासाठीं सूर्यकिरणांचा उपयोग**—इस्राइल सरकारच्या राष्ट्रीय संशोधन खात्यानें सूर्यकिरणांचा उपयोग करून पाणी तापविण्याचें यंत्र शोधून काढलें आहे. ह्या यंत्राचा उपयोग इस्राइल देशांत हजारोंच्या संख्येनें करण्यांत येत आहे. यंत्रांत दोन काचांचा विशिष्ट पद्धतीनें उपयोग करण्यांत आला आहे. ह्यांपैकीं कांहीं यंत्रें आफ्रिका व भूमध्यसमुद्रांतील देशांत निर्यातहि करण्यांत येत आहेत.

**रेवाच्या पांढऱ्या वाघांची सोय**—रेवाच्या महाराजांजवळ १० पांढरे वाघ आहेत. त्यांत कांहीं बच्चेहि आहेत. ह्या दुर्मिळ वाघांना पोसण्यास लागणारा खर्च परवडत नसल्यानें ते जंगलांत सोडून देण्यांत येणार असल्याची घोषणा महाराजांनीं केली होती. परंतु भारत सरकारनें हे वाघ आतां विकत घेण्याची तयारी दाखविली आहे. महाराजांनीं ६ वाघांसाठीं ३ लाख रुपये मागितले होते. भारत सरकारच्या मतानें ही किंमत फार आहे. आतां किंमत वाटाघाटीनें ठरविण्यांत येणार आहे. एका पिवळ्या वाघाला साधारणपणें ३ हजार रुपये पडतात.

**शेतीच्या अवजारांचा कारखाना**—ओरिसामधील संबळपूर ह्या ठिकाणीं शेतीच्या अवजारांचा एक कारखाना जपानच्या मदतीनें काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यांत यांत्रिक नांगर, कीडनाशक औषधें मारणारीं यंत्रें व शेतीला लागणारीं एंजिनें तयार करण्यांत येणार आहेत. कारखान्यांत काम करणाऱ्यांना जपानमध्यें नेऊन शिक्षण देण्यांत येणार आहे.

**संयुक्त-राष्ट्र-संघटनेचे बाँडस**— संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या सभासदांपैकीं ५८ देशांनीं संघटनेनें काढलेले बाँडस घेण्याचें कबूल केलें होतें. भारतानें नुकतेच २० लाख डॉलर्सचे बाँडस घेतले आहेत. बाँडस घेणारा भारत हा ४० वा देश आहे. संघटनेनें एकूण १३ कोटी, ४० लाख डॉलर्सचे बाँडस काढले होते. त्यांपैकीं १२ कोटी, २९ लाख, ५५ हजार डॉलर्सचे बाँडस खपले आहेत.

**कॅन्सरचें निर्दालन शक्य**—दिल्ली येथें भरविण्यांत आलेल्या छातीच्या रोगांविषयींच्या आंतरराष्ट्रीय परिषदेस आलेल्या रशियन वैद्यकीय प्रतिनिधि-मंडळाच्या पुढाऱ्यानें असा विश्वास व्यक्त केला कीं कॅन्सर ह्या रोगाचें निर्दालन करण्यांत वैद्यकशास्त्राला लवकरच यश मिळेल. ह्या रोगानें जगांत दरसाल २० लाख लोक तरी मरत असावेत, असा अंदाज त्यांनीं व्यक्त केला आहे.

**अपघाती मृत्यूबद्दल नुकसानभरपाई**—सुप्रसिद्ध सिनेनटी एलिझाबेथ टेलर हिचा पति मायकेल टॉड १९५८ मध्यें विमान-अपघातांत मृत्यु पावला. त्यानंतर नटीनें विमान कंपनीवर आपल्या पतीच्या मृत्यूबद्दल नुकसानभरपाई मागणारा दावा लावला होता. दाव्यांत ५० लाख डॉलर्सची मागणी करण्यांत आली होती. परंतु कोर्टानें अवघे ४० हजार डॉलर्सच देवविले.

**हिंदी बोलपटांना बंदी करा**—पाकिस्तानच्या बोलपट निर्मात्यांच्या संघटनेनें हिंदी बोलपटांना पाकिस्तानांतील चित्र-गृहांतून बंदी करण्यांत यावी अशी मागणी सरकारकडे केली आहे. सरकारनें काढलेला बंदीचा हुकूम अलीकडे कोर्टानें रद्द ठरविला आहे. बंदी चालू होती, त्या कालांत पाकिस्तानमधील चित्रपट व्यवसाय सुधारत चालला होता असें संघटनेचें मत आहे.

**भूमिहीनांना जमीन**—भंडारा जिल्ह्यांतील ४ हजार एकर जमीन भूमिहीन शेतमजुरांना वाटून देण्याचें महाराष्ट्र राज्य-सरकारनें ठरविलें आहे. त्याशिवाय शेतकऱ्यांना विहिरी खणण्या-साठीं कर्जेहि देण्यांत येणार आहेत. भंडारा जिल्ह्यांत ५०० नव्या विहिरी खोदल्या जाव्या अशी अपेक्षा आहे. २० भूमिहीन कुटुंबांच्या पुनर्वसनासाठीं २२४ एकर जमीन निवडण्यांत आली आहे.

ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B 3434. Licence No. 53.

वर्ष २९ | पुणें, बुधवार तारीख ६ मार्च, १९६३ | अंक ५

## विविध माहिती

**तिबेटमधील लोकरीचें उत्पादन घटलें**—गेल्या जूनमध्यें भारत व चीन ह्यांच्यामधील व्यापारी संबंध संपुष्टांत आले. त्यानंतर तिबेटमधील लोकरीच्या उत्पादनांत बरीच घट झाल्याच्या वार्ता आहेत. उभयता देशांमधील व्यापारी संबंध तुटण्यापूर्वी तिबेटमध्यें दरसाल ६० हजार मण लोकर निर्माण होत असे. ह्या लोकरीला मुख्यतः भारताचेंच गिऱ्हाईक असे. भारताची मागणी बंद झाल्यानें लोकरीचें उत्पादन घटणें अनिवार्यच होतें.

**पृथ्वीच्या पोटांतील उष्णतेपासून वीज**—संयुक्त राष्ट्र-संघटनेतर्फें भरविण्यांत आलेल्या जागतिक शास्त्रीय परिषदेंत एका इटालियन शास्त्रज्ञानें अशी माहिती सांगितली कीं, पृथ्वीच्या पोटांतील उष्णतेपासून निर्माण करण्यांत येणारी वीज ही सर्वात स्वस्त असेल. पृथ्वीवरील ज्वालामुखी असलेल्या प्रदेशांत अशी वीज निर्माण करता येईल. वीजनिर्मितीसाठी लागणारी यंत्र-सामग्री नेहमींच्या यंत्रसामग्रीपेक्षा अधिक धोक्याची असणार नाहीं.

**विशाखापट्टम् येथील बोट कारखाना**—भारतांत आणीबाणीची परिस्थिति जाहीर झाल्यानंतर विशाखापट्टम् येथील बोटी बांधण्याच्या कारखान्यासाठी लागणाऱ्या परदेशी चलनांत कपात करण्यांत आली होती. कारखान्याच्या संचालक मंडळानें ही कपात रद्द करण्याची विनंती भारत सरकारला केली आहे; त्याशिवाय आणखी २ कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची मागणी करण्यांत आली आहे.

**पाणी तापविण्यासाठी सूर्यकिरणांचा उपयोग**—इस्राइल सरकारच्या राष्ट्रीय संशोधन खात्यानें सूर्यकिरणांचा उपयोग करून पाणी तापविण्याचें यंत्र शोधून काढलें आहे. ह्या यंत्राचा उपयोग इस्राइल देशांत हजारोंच्या संख्येनें करण्यांत येत आहे. यंत्रांत दोन काचांचा विशिष्ट पद्धतीनें उपयोग करण्यांत आला आहे. ह्यांपैकीं कांहीं यंत्रें आफ्रिका व भूमध्यसमुद्रांतील देशांत निर्यातहि करण्यांत येत आहेत.

**रेवाच्या पांढऱ्या वाघांची सोय**—रेवाच्या महाराजांजवळ १० पांढरे वाघ आहेत. त्यांत कांहीं बच्चेहि आहेत. ह्या दुर्मिळ वाघांना पोसण्यास लागणारा खर्च परवडत नसल्यानें ते जंगलांत सोडून देण्यांत येणार असल्याची घोषणा महाराजांनीं केली होती. परंतु भारत सरकारनें हे वाघ आतां विकत घेण्याची तयारी दाखविली आहे. महाराजांनीं ६ वाघांसाठी ३ लाख रुपये मागितले होते. भारत सरकारच्या मतानें ही किंमत फार आहे. आतां किंमत वाटाघाटीनें ठरविण्यांत येणार आहे. एका पिवळ्या वाघाला साधारणपणें ३ हजार रुपये पडतात.

**शेतीच्या अवजारांचा कारखाना**—ओरिसामधील संबळपूर ह्या ठिकाणीं शेतीच्या अवजारांचा एक कारखाना जपानच्या मदतीनें काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यांत यांत्रिक नांगर, कीडनाशक औषधें मारणारीं यंत्रें व शेतीला लागणारीं एंजिनें तयार करण्यांत येणार आहेत. कारखान्यांत काम करणाऱ्यांना जपानमध्यें नेऊन शिक्षण देण्यांत येणार आहे.

**संयुक्त-राष्ट्र-संघटनेचे बॉंडस**— संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या सभासदांपैकी ५८ देशांनीं संघटनेनें काढलेले बॉंडस घेण्याचें कबूल केलें होतें. भारतानें नुकतेच २० लाख डॉलर्सचे बॉंडस घेतले आहेत. बॉंडस घेणारा भारत हा ४० वा देश आहे. संघटनेनें एकूण १३ कोटी, ४० लाख डॉलर्सचे बॉंडस काढले होते. त्यांपैकी १२ कोटी, २९ लाख, ५५ हजार डॉलर्सचे बॉंडस खपले आहेत.

**कॅन्सरचें निर्दालन शक्य**—दिल्ली येथें भरविण्यांत आलेल्या छातीच्या रोगांविषयींच्या आंतरराष्ट्रीय परिषदेस आलेल्या रशियन वैद्यकीय प्रतिनिधि-मंडळाच्या पुढाऱ्यानें असा विश्वास व्यक्त केला कीं कॅन्सर ह्या रोगाचें निर्दालन करण्यांत वैद्यकशास्त्राला लवकरच यश मिळेल. ह्या रोगानें जगांत दरसाल ३० लाख लोक तरी मरत असावेत, असा अंदाज त्यांनीं व्यक्त केला आहे.

**अपघाती मृत्यूबद्दल नुकसानभरपाई**—सुप्रसिद्ध सिनेनटी एलिझाबेथ टेलर हिचा पति मायकेल टॉड १९५८ मध्यें विमान-अपघातांत मृत्यु पावला. त्यानंतर नटीनें विमान कंपनीवर आपल्या पतीच्या मृत्यूबद्दल नुकसानभरपाई मागणारा दावा लावला होता. दाव्यांत ५० लाख डॉलर्सची मागणी करण्यांत आली होती. परंतु कोर्टानें अवघे ४० हजार डॉलर्सच देवविले.

**हिंदी बोलपटांना बंदी करा**—पाकिस्तानच्या बोलपट निर्मात्यांच्या संघटनेनें हिंदी बोलपटांना पाकिस्तानांतील चित्रगृहांतून बंदी करण्यांत यावी अशी मागणी सरकारकडे केली आहे. सरकारनें काढलेला बंदीचा हुकूम अलीकडे कोर्टानें रद्द ठरविला आहे. बंदी चालू होती, त्या कालांत पाकिस्तानमधील चित्रपट व्यवसाय सुधारत चालला होता असें संघटनेचें मत आहे.

**भूमिहीनांना जमीन**—भंडारा जिल्ह्यांतील ४ हजार एकर जमीन भूमिहीन शेतमजुरांना वाटून देण्याचें महाराष्ट्र राज्य-सरकारनें ठरविलें आहे. त्याशिवाय शेतकऱ्यांना विहिरी खणण्यासाठी कर्जेंहि देण्यांत येणार आहेत. भंडारा जिल्ह्यांत ५०० नव्या विहिरी खोदल्या जाव्या अशी अपेक्षा आहे. २० भूमिहीन कुटुंबांच्या पुनर्वसनासाठी २२४ एकर जमीन निवडण्यांत आली आहे.

## कामगाराला मोठी नुकसानभरपाई

अमेरिकेंतील बाल्टिमोर अँड ओहिओ रेलरोड कंपनीच्या एका कामगाराला अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टानें ६,२५,००० डॉलर्स नुकसानभरपाई देवविली आहे. हा कामगार कंपनीच्या कारखान्या-जवळील एका पडीत तळ्याजवळ काम करीत असता त्याला कसला तरी किडा चावला. त्यामुळें विषबाधा होऊन त्याच्या शरीरावर व पायावर अनेक फोड उठले. वैद्यकीय उपचारांचा कांहींच उपयोग न होऊन दुखणें वाढत गेले व अखेर त्या कामगाराचे पाय तोडावे लागले. कामाच्या जागेशेजारी जीविताला धोका असण्यासारखी परिस्थिति ठेवल्याबद्दल त्यानें कंपनीवर नुकसानभरपाईची फिर्याद दाखल केली होती. मूळच्या कोर्टात कामगाराच्या बाजूनें निकाल लागला; पण अपिलांत कंपनीच्या बाजूनें लागला होता.

## पाकिस्तान चहा आयात करणार


१५ वर्षांपूर्वी पाकिस्तानची निर्मिती झाल्यापासून पाकिस्तान हा देश चहाची निर्यात करणारा होता. परंतु चालू वर्षी पाकिस्तानच्या सरकारनें १० लाख पौंड चहा आयात करण्याचें ठरविलें आहे. पाकिस्तानांत चहाची टंचाई भासत असून किंमतीहि झपाट्यानें वाढत चालल्या आहेत. गेल्या मे महिन्यांत पाकिस्तानांत चहाच्या किंमतीवरील निर्बंध रद्द करण्यांत आले. चहाचें उत्पादन ५·९कोटी पौंड होईल अशी अपेक्षा करण्यांत येत होती. पण ही अपेक्षा फसल्यामुळें चहाच्या किंमतींत अलीकडे दुपटीनें वाढ झाली आहे.

## अहमदाबादच्या कापडाची रशिआला निर्यात?

भारताकडून आयात करण्यांत येणाऱ्या कापडावर अमेरिकेनें निर्बंध घातले आहेत. ह्याच सुमारास आफ्रिका, हॉलंड व अरब देश ह्या गुजरातच्या कापडाच्या बाजारपेठाहि संकोच पावत आहेत. त्यामुळें अहमदाबादमधील कांहीं गिरण्या रशियाला कापड निर्यात करण्याची शक्यता अजमावून पाहात आहेत. रशिआ व पूर्व युरोपामधील देश ह्यामधून भारताच्या कापडाला बाजारपेठ मिळण्याचा संभव दिसत आहे. त्याशिवाय कांहीं कापड गिरण्या ब्राझिल, मेक्सिको व इतर दक्षिण अमेरिकन देश ह्यांनाहि कापड निर्यात करण्याच्या प्रयत्नांत आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापार खात्याचे मंत्री श्री. मनुभाई शहा रशियाला जाण्याचा संभव असून त्या वेळीं कापडनिर्यातीची चर्चा होण्याची शक्यता आहे.

## पश्चिम बंगाल व बिहार जोडणारा पूल

पूर्णिआ शहराच्या ईशान्येला २२ मैलांवर महानंदा नदीवर एक मोठा पूल बांधण्यांत आला आहे. ह्या पुलामुळें पश्चिम बंगाल व बिहार ह्यांच्यामधील वाहतूक बारमाही चालू ठेवता येईल. पुलाच्या अभावीं दरवर्षी सुमारें ६ महिने महानंदा नदीच्या पाण्यामुळें रस्त्यावरील वाहतूक बंद ठेवावी लागत असे. बिहारच्या सार्वजनिक बांधकाम खात्यानें पुलाचें काम १५ महिन्यांत पूर्ण केलें. पुलासाठी १ कोटी रुपये खर्च आला. आंतरराष्ट्रीय विकास मंडळानें भारतामधील हमरस्ते सुधारण्यासाठी ६ कोटी डॉलर्स अथवा २९ कोटी रुपयांचें कर्ज दिलें होतें. कर्जातील रक्कम वापरून पूल बांधण्यांत आला.



### कामगाराला मोठी नुकसानभरपाई

अमेरिकेंतील बाल्टिमोर अँड ओहिओ रेलरोड कंपनीच्या एका कामगाराला अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टानें ६,२५,००० डॉलर्स नुकसानभरपाई देवविली आहे. हा कामगार कंपनीच्या कारखान्या-जवळील एका पडीत तळ्याजवळ काम करीत असता त्याला कसला तरी किडा चावला. त्यामुळें विषबाधा होऊन त्याच्या शरीरावर व पायावर अनेक फोड उठले. वैद्यकीय उपचारांचा कांहींच उपयोग न होऊन दुखणें वाढत गेले व अखेर त्या कामगाराचे पाय तोडावे लागले. कामाच्या जागेशेजारी जीविताला धोका असण्यासारखी परिस्थिति ठेवल्याबद्दल त्यानें कंपनीवर नुकसानभरपाईची फिर्याद दाखल केली होती. मूळच्या कोर्टांत कामगाराच्या बाजूनें निकाल लागला; पण अपिलांत कंपनीच्या बाजूनें लागला होता.

### पाकिस्तान चहा आयात करणार


१५ वर्षांपूर्वी पाकिस्तानची निर्मिती झाल्यापासून पाकिस्तान हा देश चहाची निर्यात करणारा होता. परंतु चालू वर्षी पाकिस्तानच्या सरकारनें १० लाख पौंड चहा आयात करण्याचें ठरविलें आहे. पाकिस्तानांत चहाची टंचाई भासत असून किंमतीहि झपाट्यानें वाढत चालल्या आहेत. गेल्या मे महिन्यांत पाकिस्तानांत चहाच्या किंमतीवरील निर्बंध रद्द करण्यांत आले. चहाचें उत्पादन ५·९कोटी पौंड होईल अशी अपेक्षा करण्यांत येत होती. पण ही अपेक्षा फसल्यामुळें चहाच्या किंमतींत अलीकडे दुपटीनें वाढ झाली आहे.

### अहमदाबादच्या कापडाची रशिआला निर्यात?

भारताकडून आयात करण्यांत येणाऱ्या कापडावर अमेरिकेनें निर्बंध घातले आहेत. ह्याच सुमारास आफ्रिका, हॉलंड व अरब देश ह्या गुजरातच्या कापडाच्या बाजारपेठाहि संकोच पावत आहेत. त्यामुळें अहमदाबादमधील कांहीं गिरण्या रशियाला कापड निर्यात करण्याची शक्यता अजमावून पाहात आहेत. रशिआ व पूर्व युरोपामधील देश ह्यामधून भारताच्या कापडाला बाजारपेठ मिळण्याचा संभव दिसत आहे. त्याशिवाय कांहीं कापड गिरण्या ब्राझिल, मेक्सिको व इतर दक्षिण अमेरिकन देश ह्यांनाहि कापड निर्यात करण्याच्या प्रयत्नांत आहेत. आंतरराष्ट्रीय व्यापार खात्याचे मंत्री श्री. मनुभाई शहा रशियाला जाण्याचा संभव असून त्या वेळीं कापडनिर्यातीची चर्चा होण्याची शक्यता आहे.

### पश्चिम बंगाल व बिहार जोडणारा पूल

पूर्णिआ शहराच्या ईशान्येला २२ मैलांवर महानंदा नदीवर एक मोठा पूल बांधण्यांत आला आहे. ह्या पुलामुळें पश्चिम बंगाल व बिहार ह्यांच्यामधील वाहतूक बारमाही चालू ठेवता येईल. पुलाच्या अभावीं दरवर्षी सुमारें ६ महिने महानंदा नदीच्या पाण्यामुळें रस्त्यावरील वाहतूक बंद ठेवावी लागत असे. बिहारच्या सार्वजनिक बांधकाम खात्यानें पुलाचें काम १५ महिन्यांत पूर्ण केलें. पुलासाठी १ कोटी रुपये खर्च आला. आंतरराष्ट्रीय विकास मंडळानें भारतामधील हमरस्ते सुधारण्यासाठी ६ कोटी डॉलर्स अथवा २९ कोटी रुपयांचें कर्ज दिलें होतें. कर्जातील रक्कम वापरून पूल बांधण्यांत आला.



# अर्थ

बुधवार, ता. ६ मार्च, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## दालमिया-जैन गटांतील कंपन्यांच्या गैरकारभारावर प्रकाश

दालमिआ—जैन गटांतील कंपन्यांत मोठ्या प्रमाणावर गैरकारभार चालू असल्याबद्दल मरहूम फेरोझ गांधी ह्यांनीं लोकसभेंत तक्रार केली होती. त्यानंतर भारत सरकारनें संबंधित कंपन्यांच्या कारभारांची चौकशी करण्यासाठीं व्हिव्हिअन बोस चौकशी-मंडळ नेमलें. चौकशी-मंडळाच्या अहवालावर १५ जून, १९६२ रोजीं अध्यक्षांच्या व सभासदांच्या सह्या झाल्या आणि तो २३ डिसेंबर १९६२ रोजीं लोकसभेला सादर करण्यांत आला. फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संघटनेनें केलेल्या पाहणीप्रमाणें दालमिआ-जैन गट भारतामधील चौथ्या क्रमांकाची औद्योगिक संघटना आहे. ह्या गटांत ९ कंपन्या आहेत. चौकशी मंडळानें असा अंदाज केला आहे कीं १९४६ ते १९५६ ह्या काळांत श्री. रामकृष्ण दालमिआ ह्यांनीं आपल्या नियंत्रणाखालीं असलेल्या कंपन्यांच्या मार्फत २,६० २२,७८१ रुपयांची कमाई व्यक्तिशः केली. त्यांच्या नातेवाइकांनीं आणखी किती कमाई केली ह्याबद्दल कमिशनला पुरेशी माहिती मिळू शकली नाहीं. सार्वजनिक भांडवलाच्या कंपन्यांमार्फत श्री. दालमिआ ह्यांनीं मिळविलेल्या कमाईचा तपशील असा आहे. दालमिआ—जैन एअरवेज १·८२ कोटी रुपये; दालमिआ-जैन एव्हिएशन १·९८ कोटी रुपये; दालमिआ दाद्री सिमेंट ११·७६ लाख रु., दालमिआ सिमेंट अँड पेपर मार्केटिंग बोर्ड २३·३० लाख रु., लाहोर इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी २३·१८ लाख रु. ह्याशिवाय ह्या गटांतील कंपन्यांनीं प्राप्तीवरील कर चुकवूनहि पैसे मिळविले आहेत. कमिशनच्या अंदाजाप्रमाणें १,४५,१९,२७० रुपयांचा कर गटांतील कंपन्यांनीं चुकविला आहे. सरकारी तिजोरीला हा भूर्दंड सोसावा लागला हे उघडच आहे.

गटांतील उद्योगपति श्री. श्रीयान्स प्रसाद जैन ह्यांनीं करारांतील मुदतीपूर्वी नौकरी रद्द केल्याच्या निमित्तानें ७लाख रुपये नुकसानभरपाई घेतली. दालमिआ-जैन गटांतील एका कंपनीचा प्रमुख म्हणून त्यांची नेमणूक १९४३ सालीं करण्यांत आली होती. त्यांचा पगार दरमहा रु. ४,००० होता व त्याशिवाय भत्ते वगैरे मिळून त्यांना दरमहा आणखी १,४०० रुपये मिळत असत; त्यांची नेमणूक झाली त्यावेळीं त्यांचें वय ३६ होतें. त्यांची नेमणूक २५ वर्षांसाठी करण्यांत आली होती. इतक्या वयाच्या माणसाला सरकारी नोकरींतसुद्धां २५ वर्षांची नेमणूक मिळत नाहीं आणि भत्ते वगैरे मिळून दरमहा ५,४०० रुपये इतका मेहनतानाहि त्याला दिला जात नाहीं, असें कमिशननें म्हटलें आहे. ज्या कंपनीचे ते नौकर नेमले गेले होते त्या कंपनीनें आपल्या साधारण भागावर १९४१ पासून आणि अग्रहक्काच्या भागावर १९४३ पासून नफा वाटलेला नव्हता; आणि तरीहि श्री. जैन ह्यांना ७ लाखांची नुकसानभरपाई देण्यांत आली. कमिशननें केलेल्या अंदाजाप्रमाणें गटांतील कंपन्यांच्या गैरकारभारामुळें भांडवल गुंतविलेल्या भागीदारांना २,६०,५०,२८० रुपयांचा फटका बसला. कमिशनपुढें आलेल्या पुराव्यावरून श्री. रामकृष्ण दालमिया ह्यांच्या प्रेरणेनेच सर्व गैरप्रकार चालत असत. सर्व कंपन्यांवर त्यांचेंच नियंत्रण चालत असे आणि कारभारांतील कोणतीहि घटना त्यांना माहीत असल्याशिवाय व त्यांच्या संमतीशिवाय घडणें अशक्यच होतें. गैरकारभाराच्या प्रकारांची जबाबदारी नाकारण्याचा प्रयत्नहि त्यांनीं केलेला नाहीं.

दालमिया—जैन गटांतील कंपन्यांच्या चालकांपैकीं एक प्रमुख चालक श्री. शांतिप्रसाद जैन हे होत. गैरप्रकारांच्या कांहीं कारवायांत त्यांचें स्थान श्री. रामकृष्ण दालमिया ह्यांच्या खालोखाल लागतें. एखादी संशयास्पद हालचाल अगर कारवाई त्यांच्या नजरेस आली कीं ते आपण नाममात्र चालक असल्याचें सांगत, तर कित्येक वेळा अशा प्रकारांची जबाबदारी दुसऱ्या डायरेक्टरांवर टाकण्याचा प्रयत्न करीत. ह्या गटांतील कंपन्यांचे चालक एखाद्या कुटुंबाप्रमाणें कारभार पाहात असत व श्री. रामकृष्ण दालमिया ह्यांच्याकडे तर परमेश्वराच्या भावनेनें पाहात असत, असें आश्चर्यकारक विधान त्यांनीं कमिशनपुढील चौकशींत केलें आहे. श्री. शांतिप्रसाद जैन ह्यांचें गटांतील कंपन्यांवर प्रत्यक्ष नियंत्रण नव्हतें, परंतु कंपन्यांच्या हिशोबाबद्दलची जबाबदारी थेट त्यांचीच होती. कमिशनला जे प्रकार अयोग्य अगर फसवाफसवीचे अगर इतर दृष्टींनीं आक्षेपार्ह वाटले ते हिशोबांत फिरवाफिरवी करून अगर जमवाजमवी करून केलेले होते. हिशोबांत अशा प्रकारचा हस्तक्षेप करण्याची जबाबदारी श्री. शांतिप्रसाद जैन ह्यांच्याकडे जात असल्याचें स्पष्ट दिसून आलें. दालमिया—जैन गटांतील कंपन्यांच्या चालकांनीं सार्वजनिक भांडवलाच्या कंपन्या, बँका व विमाकंपन्या ह्यांच्याकडील पैशाचा अयोग्य रीतीनें वापर केला. त्या कंपन्यांजवळ संचित साधनें मोठ्या प्रमाणावर होतीं व त्यांच्याजवळ बरीच रोकड होती. अशा कंपन्यांचे भाग खरेदी करण्याकडे त्यांनीं वरील पैशाचा उपयोग केला व त्यांच्यावर आपलें नियंत्रण उत्पन्न केलें. ज्या कंपन्यांवर त्यांनी अशा रीतीनें हुकमत मिळवली त्या कंपन्यांचें अहित करून त्यांनीं स्वतःचा मात्र अयोग्य पद्धतीनें फायदा करून घेतला.

वाममार्गानें पैसा मिळविण्याच्या अनेक मार्गांपैकीं एक मार्ग म्हणजे एखादी नियंत्रणाखालील कंपनी स्वेच्छेनें गुंडाळण्याचा. एखादी कंपनी स्वेच्छेनें गुंडाळण्याचें ठरवावयाचें, ती गुंडाळण्यासाठी पूर्वनियोजित योजनेप्रमाणें एखाद्या लिक्विडेटरची नेमणूक करावयाची, कोर्टाकडून कंपनी गुंडाळण्याच्या एखाद्या योजनेला संमति घ्यावयाची व संबंधित कंपनीचें दप्तर, हिशोबाचीं पुस्तकें व मालमत्ता दालमिया—जैन गटांतीलच एखाद्या कंपनीकडे वर्ग करावयाची. ह्या नव्या कंपनींतील डायरेक्टर्स हे श्री. दालमियांच्या हातांतील बाहुलींच असावयाचीं. मग हातीं आलेलें दप्तर व हिशोबाचीं पुस्तकें ह्यांचा नाश करावयाचा. अर्थातच पहिल्या गुंडाळलेल्या कंपनींतील गैरप्रकारांचा व बनवाबनवीच्या प्रकारांचा सर्व पुरावा

# अर्थ

बुधवार, ता. ६ मार्च, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## दालमिया-जैन गटांतील कंपन्यांच्या गैरकारभारावर प्रकाश

दालमिआ–जैन गटांतील कंपन्यांत मोठ्या प्रमाणावर गैरकारभार चालू असल्याबद्दल मरहूम फेरोझ गांधी ह्यांनीं लोकसभेंत तक्रार केली होती. त्यानंतर भारत सरकारनें संबंधित कंपन्यांच्या कारभारांची चौकशी करण्यासाठी व्हिव्हिअन बोस चौकशी-मंडळ नेमलें. चौकशी-मंडळाच्या अहवालावर १५ जून, १९६२ रोजीं अध्यक्षांच्या व सभासदांच्या सह्या झाल्या आणि तो २३ डिसेंबर १९६२ रोजीं लोकसभेला सादर करण्यांत आला. फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संघटनेनें केलेल्या पाहणीप्रमाणें दालमिआ-जैन गट भारतामधील चौथ्या क्रमांकाची औद्योगिक संघटना आहे. ह्या गटांत ९ कंपन्या आहेत. चौकशी मंडळानें असा अंदाज केला आहे कीं १९४६ ते १९५६ ह्या काळांत श्री. रामकृष्ण दालमिआ ह्यांनीं आपल्या नियंत्रणाखाली असलेल्या कंपन्यांच्या मार्फत २,६० २२,७८१ रुपयांची कमाई व्यक्तिशः केली. त्यांच्या नातेवाइकांनीं आणखी किती कमाई केली ह्याबद्दल कमिशनला पुरेशी माहिती मिळू शकली नाहीं. सार्वजनिक भांडवलाच्या कंपन्यांमार्फत श्री. दालमिआ ह्यांनीं मिळविलेल्या कमाईचा तपशील असा आहे. दालमिआ–जैन एअरवेज १·८२ कोटी रुपये; दालमिआ-जैन एव्हिएशन १·९८ कोटी रुपये; दालमिआ दाद्री सिमेंट ११·७६ लाख रु., दालमिआ सिमेंट अँड पेपर मार्केटिंग बोर्ड २३·२० लाख रु., लाहोर इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी २३·१८ लाख रु. ह्याशिवाय ह्या गटांतील कंपन्यांनीं प्राप्तींवरील कर चुकवूनहि पैसे मिळविले आहेत. कमिशनच्या अंदाजाप्रमाणें १,४५,१९,२७० रुपयांचा कर गटांतील कंपन्यांनीं चुकविला आहे. सरकारी तिजोरीला हा भूर्दंड सोसावा लागला हे उघडच आहे.

गटांतील उद्योगपति श्री. श्रीयान्स प्रसाद जैन ह्यांनीं करारांतील मुदतीपूर्वी नौकरी रद्द केल्याच्या निमित्तानें ७लाख रुपये नुकसानभरपाई घेतली. दालमिआ-जैन गटांतील एका कंपनीचा प्रमुख म्हणून त्यांची नेमणूक १९४३ सालीं करण्यांत आली होती. त्यांचा पगार दरमहा रु. ४,००० होता व त्याशिवाय भत्ते वगैरे मिळून त्यांना दरमहा आणखी १,४०० रुपये मिळत असत; त्यांची नेमणूक झाली त्यावेळीं त्यांचें वय २६ होतें. त्यांची नेमणूक २५ वर्षांसाठी करण्यांत आली होती. इतक्या वयाच्या माणसाला सरकारी नोकरींतसुद्धां २५ वर्षांची नेमणूक मिळत नाहीं आणि भत्ते वगैरे मिळून दरमहा ५,४०० रुपये इतका मेहनतानाहि त्याला दिला जात नाहीं, असें कमिशननें म्हटलें आहे. ज्या कंपनीचे ते नौकर नेमले गेले होते त्या कंपनीनें आपल्या साधारण भागावर १९४१ पासून आणि अग्रहक्काच्या भागावर १९४३ पासून नफा वाटलेला नव्हता; आणि तरीहि श्री. जैन ह्यांना ७ लाखांची नुकसानभरपाई देण्यांत आली. कमिशननें केलेल्या अंदाजाप्रमाणें गटांतील कंपन्यांच्या गैरकारभारामुळें भांडवल गुंतविलेल्या भागीदारांना २,६०,५०,२८० रुपयांचा फटका बसला. कमिशनपुढें आलेल्या पुराव्यावरून श्री. रामकृष्ण दालमिया ह्यांच्या प्रेरणेनेच सर्व गैरप्रकार चालत असत. सर्व कंपन्यांवर त्यांचेंच नियंत्रण चालत असे आणि कारभारांतील कोणतीहि घटना त्यांना माहीत असल्याशिवाय व त्यांच्या संमतीशिवाय घडणें अशक्यच होतें. गैरकारभाराच्या प्रकारांची जबाबदारी नाकारण्याचा प्रयत्नहि त्यांनी केलेला नाहीं.

दालमिया–जैन गटांतील कंपन्यांच्या चालकांपैकी एक प्रमुख चालक श्री. शांतिप्रसाद जैन हे होत. गैरप्रकारांच्या कांहीं कारवायांत त्यांचें स्थान श्री. रामकृष्ण दालमिया ह्यांच्या खालोखाल लागतें. एखादी संशयास्पद हालचाल अगर कारवाई त्यांच्या नजरेस आली कीं ते आपण नाममात्र चालक असल्याचें सांगत, तर कित्येक वेळा अशा प्रकारांची जबाबदारी दुसऱ्या डायरेक्टरांवर टाकण्याचा प्रयत्न करीत. ह्या गटांतील कंपन्यांचे चालक एखाद्या कुटुंबाप्रमाणें कारभार पाहात असत व श्री. रामकृष्ण दालमिया ह्यांच्याकडे तर परमेश्वराच्या भावनेनें पाहात असत, असें आश्चर्यकारक विधान त्यांनीं कमिशनपुढील चौकशींत केलें आहे. श्री. शांतिप्रसाद जैन ह्यांचे गटांतील कंपन्यांवर प्रत्यक्ष नियंत्रण नव्हतें, परंतु कंपन्यांच्या हिशोबाबद्दलची जबाबदारी थेट त्यांचीच होती. कमिशनला जे प्रकार अयोग्य अगर फसवाफसवीचे अगर इतर दृष्टींनीं आक्षेपार्ह वाटले ते हिशोबांत फिरवाफिरवी करून अगर जमवाजमवी करून केलेले होते. हिशोबांत अशा प्रकारचा हस्तक्षेप करण्याची जबाबदारी श्री. शांतिप्रसाद जैन ह्यांच्याकडे जात असल्याचें स्पष्ट दिसून आलें. दालमिया–जैन गटांतील कंपन्यांच्या चालकांनीं सार्वजनिक भांडवलाच्या कंपन्या, बँका व विमाकंपन्या ह्यांच्याकडील पैशाचा अयोग्य रीतीनें वापर केला. त्या कंपन्यांजवळ संचित साधनें मोठ्या प्रमाणावर होतीं व त्यांच्याजवळ बरीच रोकड होती. अशा कंपन्यांचे भाग खरेदी करण्याकडे त्यांनीं वरील पैशाचा उपयोग केला व त्यांच्यावर आपलें नियंत्रण उत्पन्न केलें. ज्या कंपन्यांवर त्यांनी अशा रीतीनें हुकमत मिळवली त्या कंपन्यांचें अहित करून त्यांनीं स्वतःचा मात्र अयोग्य पद्धतीनें फायदा करून घेतला.

वाममार्गानें पैसा मिळविण्याच्या अनेक मार्गांपैकी एक मार्ग म्हणजे एखादी नियंत्रणाखालील कंपनी स्वेच्छेनें गुंडाळण्याचा. एखादी कंपनी स्वेच्छेनें गुंडाळण्याचें ठरवावयाचें, ती गुंडाळण्यासाठी पूर्वनियोजित योजनेप्रमाणें एखाद्या लिक्विडेटरची नेमणूक करावयाची, कोर्टाकडून कंपनी गुंडाळण्याच्या एखाद्या योजनेला संमति घ्यावयाची व संबंधित कंपनीचें दप्तर, हिशोबाचीं पुस्तकें व मालमत्ता दालमिया–जैन गटांतीलच एखाद्या कंपनीकडे वर्ग करावयाची. ह्या नव्या कंपनींतील डायरेक्टर्स हे श्री. दालमियांच्या हातांतील बाहुलींच असावयाचीं. मग हातीं आलेलें दप्तर व हिशोबाचीं पुस्तकें ह्यांचा नाश करावयाचा. अर्थातच पहिल्या गुंडाळलेल्या कंपनींतील गैरप्रकारांचा व बनवाबनवीच्या प्रकारांचा सर्व पुरावा

नाहींसा होई. १९५२ सालीं भागधारकांच्या तक्रारीवरून सरकारनें दालमिया जैन एअरवेज कंपनीच्या कारभाराची चौकशी करण्याचा हुकूम दिला. पण ही गोष्ट भागधारकांना कळविण्यांत आली नाहीं. नंतर लवकरच वरील कंपनी स्वेच्छेनें गुंडाळण्याचा निर्णय घेण्यांत आला. नेहमींच्या तंत्राप्रमाणें श्री. रामकृष्ण दालमिया ह्यांनीं एका लिक्विडेटरची नेमणूक केली. लिक्विडेटरला ५२ हजार रुपये मेहनतानां ठरविण्यांत आला, व देण्यांतहि आला. ह्या रकमेपैकीं २० हजार रुपये लिक्विडेटरनें नंतर परत केले.

श्री. वा. काळे ह्यांचें नवें पुस्तक

**जयां अंगीं मोठेपण**

दि. १० मार्च रोजीं प्रसिद्ध होणार.

पृ. सं. ११६ १४ छायाचित्रें | व्हीनस प्रकाशन, पुणें २. | मार्मिक प्रस्तावना किंमत रु. ३=००

दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.

## नो टी स

नोटीस देण्यांत येते कीं, कंपनीच्या भागीदारांची २८ वी वार्षिक साधारण सभा शनिवार, दिनांक ३० मार्च, १९६३ रोजीं दुपारीं १–३० वाजतां ( भारतीय प्रमाण वेळ ) गोखले हॉल, ५४८ सदाशिव पेठ, लक्ष्मी रस्ता, पुणें शहर, या ठिकाणीं नेहमींचे कामकाजासाठी म्हणजे दिनांक ३१डिसेंबर,१९६२ चा ताळेबंद व नफा–तोटा पत्रक यांचा विचार करणें, डिव्हिडंड मंजूर करणें, निवृत्त होणाऱ्या संचालकांचे जागीं संचालकांची निवडणूक करणें, हिशेबतपासनीसांची नेमणूक करणें, वगैरेंसाठी व कांहीं विशेष स्वरूपाचे कामकाजासाठी भरेल. सभेपुढें येणाऱ्या कामकाजाचा तपशील, भागीदारांस बँकेचा दिनांक ३१ डिसेंबर, १९६२ अखेरचा ताळेबंद व नफा–तोटा पत्रक व संचालकांचा अहवाल यांसोबत स्वतंत्रपणें पाठविण्यांत येत आहे.

बोर्डाचे हुकुमावरून,
सी. व्ही. जोग,
जनरल मॅनेजर.

पुणें २,
दिनांक १३ फेब्रुवारी, १९६३.

सूचनाः—१. बँकेचीं शेअर ट्रॅन्स्फर बुकें बुधवार, दिनांक १३ मार्च, १९६३ ते रविवार दिनांक ३१ मार्च, १९६३ ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहतील.

२. डिव्हिडंड मंजूर झाल्यानंतर ते, दि. ३०मार्च, १९६३रोजीं भागधारकांच्या रजिस्टरवर नांवें असलेल्या भागधारकांना दि. ३१ डिसेंबर, १९६२ पूर्वी विक्रीस काढलेल्या व अलॉट केलेल्या एक लाख भागांवर बुधवार, दिनांक १० एप्रिल, १९६३ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरंटस् भागधारकांच्या नोंदलेल्या पत्त्यावर टपालानें पाठविलीं जातील. पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.

### शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांच्या उत्पादनांत वाढ

१९६२ च्या आक्टोबरमध्यें चीननें भारतावर आक्रमण केलें. तेव्हांपासून संरक्षणासाठी लागणाऱ्या लष्करी साहित्याच्या उत्पादनाकडे तांतडीनें लक्ष पुरविण्यास प्रारंभ झाला. आक्रमण थोपवून धरण्यासाठी कॉमनवेल्थ राष्ट्रगटांतील देशांनीं व मुख्यतः अमेरिकेनें त्वरित व उपयुक्त मदत दिली असली तरी लष्कराला लागणाऱ्या सर्व सामग्रीचें उत्पादन भारतांत होणेंच स्वयंपूर्णतेच्या दृष्टीनें आवश्यक आहे. त्या दृष्टीनें चालू करण्यांत आलेल्या हालचालींना आतां फळें येऊं लागलीं आहेत. लष्कराला लागणारा दारूगोळा व इतर उपकरणें ह्यांच्या उत्पादनाचें काम भारतामधील शस्त्रास्त्रांचे कारखाने अहोरात्र करीत आहेत. चालू वर्षाच्या जून महिन्यांत ह्या सामग्रीच्या उत्पादनाची अखेरची मर्यादा गाठली जाईल असा अंदाज आहे. उत्पादनाचे तपशीलवार आंकडे अर्थातच गुप्त राखण्यांत आले आहेत. परंतु वाढत्या उत्पादनाची खूण म्हणून असें सांगण्यांत येत आहे कीं १९४१ सालीं ब्रिटनमध्यें लष्करी साहित्याची जेवढी निर्मिति करण्यांत येत होती. त्याहीपेक्षा अधिक आज भारतांत करण्यांत येत आहे. लष्कराच्या उपयोगासाठी लागणारी सामग्री अनंत प्रकारची असते. साध्या बंदुकातोफांपासून तों टेलेकम्युनिकेशन्सच्या गुंतागुंतीच्या साधनांचा ह्या सामग्रींत अंतर्भाव होतो. रणगाड्याविरुद्ध वापरावयाच्या एका प्रकारच्या विशिष्ट तोफेचें उत्पादन तर १० पटीनें वाढलें आहे. त्याचप्रमाणें स्वयंचलित शस्त्रास्त्रांचें उत्पादनहि मोठ्या प्रमाणावर वाढलें आहे.

टेलेकम्युनिकेशन्सचीं साधनें भारतीय लष्कराजवळ चीनच्या आक्रमणाच्या वेळीं नव्हतीं असा समज पसरलेला आहे; परंतु तो खरा नाहीं. हीं साधनें असूनहि लष्कराला त्यांचा उपयोग झाला नाहीं. भारताच्या उत्तर सरहद्दीवर झालेलें आक्रमण १० ते १४ हजार फूट उंचीच्या डोंगराळ भागांत झालें. तेथील हवेचा दाब, तपमान, इत्यादी भौतिक परिस्थितीमुळें वरील साधनांना विजेचा अंगचा पुरवठा नीट झाला नाहीं त्यामुळें साधनें असूनहि तीं निरुपयोगी ठरलीं. इतक्या उंचीवर सुद्धां वीजपुरवठा चांगल्या तऱ्हेनें करणाऱ्या विजेच्या तारा आतां तयार करण्यांत आल्या आहेत. भारताच्या आर्थिक परिस्थितीमुळें अमेरिकन लष्करांत वापरली जाणारी सर्वच सामुग्री वापरणें भारताला परवडणार नाहीं. अमेरिकन लष्कराच्या दळणवळणाच्या साधनांत ट्रॅन्झिस्टरचलित साधनांवर प्रमुख भर असतो. अशा साधनांची निर्मिति अमेरिकेंत फार मोठ्या प्रमाणावर करण्यांत येते आणि साधनें बिघडल्यास अगर जुनीं झाल्यास तीं सरळ रद्दी ठरविण्यांत येतात. शिवाय, अशा साधनांच्या दुरुस्तीसाठी लागणारे तंत्रज्ञहि भारतांत अजून तरी फारसे नाहींत. दळणवळणाचीं जुन्या प्रकारचीं साधनें अवजड असतात हें खरें; परंतु त्यांची दुरुस्ती करणें तुलनात्मक दृष्ट्या सोपें असतें, शिवाय तीं वापरण्याचें ज्ञानहि सुलभतेनें मिळवितां येतें. इलेक्ट्रॉनिक्सवर आधारलेलीं अशा प्रकारचीं दोनशें उपकरणें भारत इलेक्ट्रॉनिक्स कारखान्यांत यशस्वी रीत्या निर्माण करण्यांत येत आहेत. शस्त्रास्त्रांच्या कारखान्यांतील उत्पादन वाढविण्यांत कामगारांचें सहकार्य चांगलें प्रकट झालें आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# रशियाचें १९६३ चें अंदाजपत्रक

## कांहीं नवीन उपक्रम

लेखकः शरद कुलकर्णी, एम्. ए. (Econ.) एम्. ए. (Pol)

सप्तवार्षिक योजनेंतील पांचव्या वर्षांचें म्हणजे १९६३ चें अंदाजपत्रक रशियन सर्वोच्च सोविएतनें नुकतेंच मंजूर केलें. हें अंदाजपत्रक अर्थातच खालपासूनच्या सहकार्यानें तयार केलें आहे. अंदाजपत्रक व योजना यांचे मूळ आढाखे बांधण्याचे कामीं अनेक सूचना करण्यांत आल्या. उद्योगधंदे व त्यांची संघटना, उत्पादनवाढ, सामाजिक व सांस्कृतिक कार्यांत सुधारणा याबद्दल या सूचना होत्या. १९६३ च्या अंदाजपत्रकांत सप्त-वार्षिक योजनेंतील पहिल्या चार वर्षांतील प्रगतीचा आढावा घेतला आहे व पुढील वर्षाचा कार्यक्रम दिला आहे. १९५९-६२ या काळांत औद्योगिक उत्पादन ४५ टक्क्यांनीं वाढलें. (नियोजित वाढ ३५ टक्के होती.) राष्ट्रीय उत्पन्न ३२ टक्क्यांनीं वाढलें.

### महत्त्वाचे प्रश्न

प्रगतीच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाचे प्रश्न अर्थशास्त्र व राष्ट्रीय अर्थव्यवस्थेची घडी, हिशोबाची पद्धत व सर्वव्यापी नियंत्रण हे आहेत. या सर्व बाबतींत आणखी सुधारणा करण्यांत येत आहेत. उत्पादनाला सोयीची पुनर्घटना, तांत्रिक मार्गदर्शनांचें एकसूत्री-करण, नियोजन पद्धतींत सुधारणा, संयुक्त नियंत्रण व राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचें लोकशाही केंद्रीकरण यांत नवीन प्रयोग करण्यांत येत असून या सर्वांचे प्रतिबिंब १९६३ च्या रशियन अंदाजपत्र-कांत दिसून येत आहे.

पूर्वनियोजित आर्थिक धोरणाला अनुसरून हें १९६३ चें अंदाजपत्रक तयार करण्यांत आलें आहे. राष्ट्रीय उत्पन्न ८७,७०० दशलक्ष रुबल दाखविलें असून, खर्च ८६,२०० दशलक्ष रुबल दाखविला आहे. शिल्लक १,५०० दशलक्ष रुबल दाखविली आहे. जमेपैकीं ९० टक्के रकम राष्ट्रीय उद्योगधंद्यांकडून फायदा व कर यांच्या रूपानें मिळेल. उरलेली रकम नागरिकांकडून करांच्या रूपानें गोळा होईल. खर्चाच्या बाजूला मोठ्या आर्थिक व इतर योजनांसाठी तरतूद करून ठेवण्यांत आली आहे. अशा योजनां-वर १९६३ च्या जमेपैकीं ७६ टक्के खर्च होईल. आर्थिक प्रगती-साठी ३४,५०० दशलक्ष रुबलची तरतूद करण्यांत आली आहे. एकंदर भांडवल-गुंतवणूक ६३,२०० दशलक्ष रुबल ठरविण्यांत आली आहे. नवीन अंदाजपत्रकांत नवोदित, स्वतंत्र राष्ट्रांना व समाजवादी-मित्रराष्ट्रांना कर्जे देण्याची तरतूद केलेली आहे. रशियन तांत्रिक व आर्थिक मदतीनें या वर्षी परदेशांत सर्व प्रकारचीं मिळून एकंदर ४६८ कामें चालणार आहेत.

### प्रगतीच्या योजनांवर खर्च

राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या प्रमुख शाखा वाढवण्याकडे लक्ष पुर-विण्यांत आलें आहे. जड व इतर उद्योगधंदे वाढविण्याची तरतूद करण्यांत आली आहे. यासाठी एकंदर ३३,७०० दशलक्ष रुबल दाखविण्यांत आले आहेत. सर्वांत जास्त भांडवलगुंतवणूक रासा-यनिक उद्योगधंद्यांत होईल. कारण, यांतील प्रगतीवर शेती व इतर उद्योगधंद्यांची प्रगति अवलंबून आहे. बांधकामांत भांडवल गुंतविण्यास १९६३ चें अंदाजपत्रक मोठ्या प्रमाणावर मदत करील. कारखाने, घरें, इस्पितळें, शाळा व इतर बांधकामावर मिळून ३३,५०० दशलक्ष रुबल खर्च होईल. महत्त्वाच्या बांधकामाकडे व अपुरीं कामें पुरीं करण्याकडे विशेष लक्ष दिलें जाईल. या धोरणानें भांडवल गुंतवणुकीपासून फायदा लौकर मिळू लागतो.

सरकारी व सहकारी शेतांना मदत करण्याची तरतूदहि या अंदाजपत्रकांत केली आहे. सरकारी खर्चानें शेतीला ट्रॅक्टर व इतर यंत्रें मिळतील. नवीन जमिनी लागवडीखाली आणणें, औद्यो-गिक शहराजवळ शेती करणें, यंत्रें, पेट्रोलियम व इतर वस्तूंच्या किंमती कमी करणें, इत्यादि कामासाठी शेतीला मिळणाऱ्या सरकारी मदतीचा उपयोग केला जातो. शेतीला मिळणारी सरकारी मदत १९६३ च्या अंदाजपत्रकांत १७ टक्क्यांनीं वाढलेली दिसून येते. व्यापार व सार्वजनिक उपहारगृहें यांच्या वाढीसाठी कांहीं रकम ठेवण्यांत आली आहे.

### सार्वजनिक हिताच्या योजना

शिक्षण, वैद्यकीय मदत, विमा योजना वगैरेंची तरतूद या अंदाजपत्रकांत केलेली आहे. यांचें वैशिष्ट्य म्हणजे सर्व जनतेसाठी असलेली मोफत औषधोपचाराची योजना, होय. १९६३ मध्यें इस्पितळें व दवाखाने यांची संख्या वाढविण्याची तरतूद करण्यांत आली आहे. लोककल्याणाच्या कार्यांत घरें-बांधणीच्या कामाला अग्रस्थान दिलें आहे. हें काम अतिशय वेगानें चालू असून १९५७ पासून आतांपर्यंत सुमारें एकतृतीयांश लोकसंख्येला नवीन घरें मिळालीं आहेत. १९६३ च्या अंदाजपत्रकांत नवीन घरें बांधण्या-साठी ५२०० दशलक्ष रुबलची तरतूद करण्यांत आली आहे. प्रगति सर्वांगीण व्हावी याकडे रशियन सरकार विशेष लक्ष देतें. प्रत्येक राज्याची सर्वांगीण प्रगति होऊन त्यांचा मध्यवर्ती कारभारां-तील हिस्सा वाढत आहे.

### प्रगतीसाठीं शांतता आवश्यक

प्रगतीसाठी शांतता व सहजीवन यांचा पुरस्कार रशिया करीत असतो. जोंपर्यंत सार्वत्रिक निःशस्त्रीकरणाची योजना सर्वमान्य झाली नाहीं तोंपर्यंत राष्ट्रीय उत्पन्नाचा कांहीं ना कांहीं भाग संरक्षणाच्या तयारीवर खर्च करणें भाग आहे. १९६३ च्या अंदाज पत्रकांत संरक्षणावरील खर्च १३,९०० दशलक्ष रुबल दाखविण्यांत आला आहे. हा खर्च एकंदर खर्चाच्या १६ टक्के येतो. रशियन जनतेचें रक्षण करण्यासाठी आवश्यक तें कार्यक्षम लष्कर ठेवण्यास हा खर्च पुरेसा आहे.

एकंदर अंदाजपत्रक रशियन जनतेच्या समाजवादी समाज-रचनेच्या ध्येयाचें निदर्शक आहे, यांत शंका नाहीं.


Statement about ownership and other particulars about newspaper 'ARTHA' to be published in the first issue every year after last day of February.

FORM IV

(See Rule 8)

1. Place of publication 823, Shivajinagar, Poona 4
2. Periodicity of its publication — Fortnightly
3. Printer's name, S. V. Kale
   Nationality. Indian
   Address. 823, Shivajinagar, Poona 4
4. Publisher's name. S. V. Kale
   Nationality Indian
   Address. 823, Shivajinagar, Poona 4
5. Editor's name. S V. Kale
   Nationality. Indian
   Address. 823, Shivajinagar, Poona 4
6. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital. — S. V. Kale, 823, Shivajinagar, Poona 4

I. Shripad Vaman Kale, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 6-3-1963 S. V. Kale

Signature of Publisher.

### ब्रह्मदेशांतील बँकांचें राष्ट्रीयीकरण

बर्माच्या सरकारनें त्या देशांतील सर्व देशी आणि विदेशी बँकांचें राष्ट्रीयीकरण करणारा हुकूम काढला आहे. एकूण २४ बँकांना हा हुकूम लागू होईल; त्यांपैकीं १४ विदेशी आहेत. ह्या विदेशी बँकांत स्टेट बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंडियन ओव्हरसीज बँक आणि युनायटेड कमर्शिअल बँक ह्या हिंदी बँकांच्या कचेऱ्यांचा समावेश आहे. लॉइड्स, नॅशनल आणि ग्रिंडलेज् ह्या ब्रिटिश बँकांनाहि हुकूम लागू आहे. राष्ट्रीयीकरण केलेल्या बँकांच्या नव्या मॅनेजरांचीं नांवें जाहीर करण्यांत आलीं आहेत; ते बहुतेक सर्व लष्करी आणि नाविक अधिकारी आहेत. हे अधिकारी संबंधित बँकांच्या कचेऱ्यांत अचानक गेले व त्यांनीं तेथील अधिकाऱ्यांना राष्ट्रीयीकरणाचा हुकूम दाखविला आणि त्यांच्या कागदपत्रांचा ताबा घेतला. आतां ह्या बँकांना नंबर देण्यांत आले आहेत. उदाहरणार्थ, सेंट्रल बँक ऑफ इंडियाला एक हा नंबर मिळाला आहे. नंबरानेंच त्या आतां ओळखल्या जातील.

---

### इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीजची प्रगति

ब्रिटनमधील इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज ही त्या देशांतील सर्वांत मोठी औद्योगिक संघटना आहे. ह्या संघटनेच्या प्रगति-परागतीवरून ब्रिटनच्या औद्योगिक जीवनाची नाडी पुष्कळदा अजमावण्यांत येतें. ह्या कंपनीच्या विक्रींत व नफ्यांत गेल्या सालीं वाढ झाल्याचें आढळून आलें. कंपनींत १,१४,००० कामगार आहेत. गेल्या सालीं कंपनीची विक्री २·९ कोटी पौंडांनीं वाढून ५७·९ कोटी पौंडापर्यंत गेली. गेल्या सालीं कंपनीला ४३ लाख पौंड अधिक नफा झाला. एकूण नफ्याचा आंकडा ३ कोटी ८४ लाख पौंड आहे. तथापि भाग-भांडवलावरील डिव्हिडंडमध्यें मात्र वाढ करण्यांत आली नाहीं.

---

### चितळी येथील स्पिरिटचा कारखाना

श्रीरामपूर तालुक्यांत चितळी येथें उसाच्या रसाच्या मळीपासून स्पिरिट तयार करण्याचा सरकारी मालकीचा कारखाना काढण्यांत आला आहे. ह्या कारखान्यांत रोज ८,५०० टन स्पिरिट निर्माण करण्यांत येतें व त्यासाठी १५० टन मळीचा उपयोग करण्यांत येतो. कारखान्यांतील उत्पादन वाढविण्यासाठी मळी साठविण्याची अधिक व्यवस्था करण्यांत येत आहे. ह्या भागांतील सहकारी मालकीच्या कारखान्यांनीं असा कारखाना सहकारी तत्त्वावर काढूं द्यावा अशी मागणी सरकारकडे केली आहे. दरम्यान सांगलीजवळ माधवनगर ह्या ठिकाणीं मळीपासून स्पिरिट तयार करण्याचा आणखी एक कारखाना उभारण्याचा विचार राज्य सरकार करीत आहे.

---

### रशिया–अफगाणिस्थान व्यापारी करार

रशिया व अफगाणिस्थान ह्या दोन देशांनीं परस्परांत एक व्यापारी करार केला आहे. ह्या कराराप्रमाणें रशिया–अफगाणिस्थानला मोटारी व त्यांचे सुटे भाग, तेलजन्य पदार्थ, कॅमेरे, घड्याळें, इत्यादि माल देणार आहे. उलटपक्षीं, अफगाणिस्थान रशियाला कापूस, लोकर, सुकीं व ताजीं फळें, इत्यादींचा पुरवठा करणार आहे.

---

### इन्कमटॅक्सची बाकी

३१ मार्च, १९६२ अखेरची इन्कमटॅक्सची येणें बाकी १४९·४२ कोटी रु. आहे.


**कण आणि क्षण**

लेखकः—श्री. वा. काळे

तिसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली !

पृ. सं. १६०. किं. रु. ३=५०

व्हीनस प्रकाशन,

३८१ क, शनिवार पुणें २.

---

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

---

श्री. वा. काळे यांचीं दोन नवीं पुस्तकें

१ दाणे आणि खडे किं. रु. २=५०

२ कौटुंबिक हितगुज किं. रु. ३=००

---

भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक

दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

लाख

वसूल भांडवल ... रु. — ९.५८

राखीव निधी ... रु. — १०.९१

ठेवी ........ रु. —२०५.४९

खेळतें भांडवल . रु. —२३५.००


मुख्य कचेरी सारस्वत बँक गृह, गिरगांव, मुंबई–४

शाखा: फोर्ट, दादर, वरळी, वडाळा, माहिम, पुणें व बेळगांव

महिला शाखा: गिरगांव, मुंबई–४

---

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES



Make doubly sure by fitting

GADRE BANDHU

MADHAVNAGAR (S.R.)

INDIA

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

### ब्रह्मदेशांतील बँकांचें राष्ट्रीयीकरण

बर्माच्या सरकारनें त्या देशांतील सर्व देशी आणि विदेशी बँकांचें राष्ट्रीयीकरण करणारा हुकूम काढला आहे. एकूण २४ बँकांना हा हुकूम लागू होईल; त्यांपैकीं १४ विदेशी आहेत. ह्या विदेशी बँकांत स्टेट बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंडियन ओव्हरसीज बँक आणि युनायटेड कमर्शिअल बँक ह्या हिंदी बँकांच्या कचेऱ्यांचा समावेश आहे. लॉइड्स, नॅशनल आणि ग्रिंडलेज् ह्या ब्रिटिश बँकांनाहि हुकूम लागू आहे. राष्ट्रीयीकरण केलेल्या बँकांच्या नव्या मॅनेजरांचीं नांवें जाहीर करण्यांत आलीं आहेत; ते बहुतेक सर्व लष्करी आणि नाविक अधिकारी आहेत. हे अधिकारी संबंधित बँकांच्या कचेऱ्यांत अचानक गेले व त्यांनीं तेथील अधिकाऱ्यांना राष्ट्रीयीकरणाचा हुकूम दाखविला आणि त्यांच्या कागदपत्रांचा ताबा घेतला. आतां ह्या बँकांना नंबर देण्यांत आले आहेत. उदाहरणार्थ, सेंट्रल बँक ऑफ इंडियाला एक हा नंबर मिळाला आहे. नंबरानेंच त्या आतां ओळखल्या जातील.

### इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीजची प्रगति

ब्रिटनमधील इंपीरिअल केमिकल इंडस्ट्रीज ही त्या देशांतील सर्वांत मोठी औद्योगिक संघटना आहे. ह्या संघटनेच्या प्रगति-परागतीवरून ब्रिटनच्या औद्योगिक जीवनाची नाडी पुष्कळदा अजमावण्यांत येतें. ह्या कंपनीच्या विक्रींत व नफ्यांत गेल्या सालीं वाढ झाल्याचें आढळून आलें. कंपनींत १,१४,००० कामगार आहेत. गेल्या सालीं कंपनीची विक्री २·९ कोटी पौंडांनीं वाढून ५७·९ कोटी पौंडापर्यंत गेली. गेल्या सालीं कंपनीला ४३ लाख पौंड अधिक नफा झाला. एकूण नफ्याचा आंकडा ३ कोटी ८४ लाख पौंड आहे. तथापि भाग-भांडवलावरील डिव्हिडंडमध्यें मात्र वाढ करण्यांत आली नाहीं.

### चितळी येथील स्पिरिटचा कारखाना

श्रीरामपूर तालुक्यांत चितळी येथें उसाच्या रसाच्या मळीपासून स्पिरिट तयार करण्याचा सरकारी मालकीचा कारखाना काढण्यांत आला आहे. ह्या कारखान्यांत रोज ८,५०० टन स्पिरिट निर्माण करण्यांत येतें व त्यासाठीं १५० टन मळीचा उपयोग करण्यांत येतो. कारखान्यांतील उत्पादन वाढविण्यासाठी मळी साठविण्याची अधिक व्यवस्था करण्यांत येत आहे. ह्या भागांतील सहकारी मालकीच्या कारखान्यांनीं असा कारखाना सहकारी तत्त्वावर काढूं द्यावा अशी मागणी सरकारकडे केली आहे. दरम्यान सांगलीजवळ माधवनगर ह्या ठिकाणीं मळीपासून स्पिरिट तयार करण्याचा आणखी एक कारखाना उभारण्याचा विचार राज्य सरकार करीत आहे.

### रशिया–अफगाणिस्थान व्यापारी करार

रशिया व अफगाणिस्थान ह्या दोन देशांनीं परस्परांत एक व्यापारी करार केला आहे. ह्या कराराप्रमाणें रशिया–अफगाणिस्थानला मोटारी व त्यांचे सुटे भाग, तेलजन्य पदार्थ, कॅमेरे, घड्याळें, इत्यादि माल देणार आहे. उलटपक्षीं, अफगाणिस्थान रशियाला कापूस, लोकर, सुकीं व ताजीं फळें, इत्यादींचा पुरवठा करणार आहे.

### इन्कमटॅक्सची बाकी

३१ मार्च, १९६२ असेरची इन्कमटॅक्सची येणें बाकी १४९·४२ कोटी रु. आहे.


**कण आणि क्षण**

लेखकः—श्री. वा. काळे

**तिसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली !**

पृ. सं. १६०. किं. रु. ३=५०

व्हीनस प्रकाशन,

३८१ क, शनिवार पुणें २.

**मा**धवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

श्री. वा. काळे यांचीं दोन नवीं पुस्तकें

१ दाणे आणि खडे किं. रु. २=५०


२ कौटुंबिक हितगुज किं. रु. ३=००






BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting


MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

**GADRE BANDHU**

MADHAVNAGAR (S.R.)

INDIA

### नव-हिंद टाइम्स

पंजिम ( गोवा ) येथें वरील इंग्रजी दैनिक सुरू झालें आहे. श्री. टी. व्ही. पर्वते आणि लँबर्ट मास्कारेन्हस हे त्याचे संपादक आहेत.

---

### मुंबईमधील ट्रॉली बसेस

मुंबई कॉर्पोरेशननें २४ लाख रुपये खर्चून झेकोस्लोव्हाकिआं-तून १२ ट्रॉली बसेस आणल्या होत्या. ह्या गाड्या लांब अंतर जाण्यासाठी होत्या. परंतु मुंबईत त्या थोडें अंतर जाण्यासाठी वापरण्यांत येऊं लागल्यानें बिघडल्या. त्या दुरुस्त करण्यासाठी लागणारे सुटे भाग आयात करावे तर परदेशी चलनाचा प्रश्न उभा राहतो. हे भाग भारतांतच तयार करावयाचे म्हटल्यास १२ ट्रॉली बसेसकरतां ते तयार करणें परवडणार नाहीं.

---

### ब्रिटिश शास्त्रज्ञ परदेशीं चालले

ब्रिटनमधील रॉयल सोसायटीनें एक कमिटी नेमून ब्रिटनमधून कायमचें परदेशीं जाणाऱ्या शास्त्रज्ञांची पाहणी करविली आहे. ह्या पाहणींत असें आढळून आलें कीं, दिवसेंदिवस ब्रिटनमधून बाहेर पडणाऱ्या शास्त्रज्ञांची संख्या वाढत चालली आहे. ह्या शास्त्रज्ञांना अधिक वेतनाचें अगर संशोधनाच्या अधिक चांगल्या सवलतींचें प्रलोभन दाखविण्यांत येतें. पाहणीसाठी मे १९५२ पासूनच्या दहा वर्षांचा काळ निवडण्यांत आला होता. शास्त्रीय विषयांत पीएच्. डी. ची पदवी मिळविलेल्यांपैकीं १२ टक्के शास्त्रज्ञ दरसाल परदेशीं जातात, असें पाहणीवरून केलेल्या अहवालांत नमूद करण्यांत आलें आहे.

### राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ उद्दिष्टापेक्षा कमी

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत भारताचें राष्ट्रीय उत्पन्न २०·४०% नें वाढलें. २५% तें वाढावें, असें उद्दिष्ट ठरविण्यांत आलेलें होतें. १९५५-५६ मध्यें राष्ट्रीय उत्पन्न १०,४८० कोटी रु. होतें, तें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या वर्षीं १२७५० कोटी रु. झालें. १९६१-६२ मधील राष्ट्रीय उत्पन्न १३,०२० कोटी रु. भरलें. १९५५-५६ मध्यें दरमाणशीं उत्पन्न २६७ रु. होतें तें १९६०-६१ मध्यें २९३ रु. आणि १९६१–६२ मध्यें तें तितकेंच राहिल्याचा अंदाज आहे.

---

### भारतामधील भाषांचा अभ्यास

आशिआंतील लोकांचा अभ्यास करणारी एक स्वतंत्र संस्था रशिआंत आहे. ह्या संस्थेचे प्रमुख भारताच्या दौऱ्यावर आले होते. त्यांनीं आपल्या दौऱ्यांत असें सांगितलें कीं, भारतामधील प्रमुख भाषांचा अभ्यास करण्याची प्रवृत्ति रशिआंत वाढत चालली आहे. भारतीय भाषांत असणाऱ्या ग्रंथांचीं रशिअन भाषांतरेंहि अधिक होत चाललीं आहेत.

---

### केरळमधील वीजकेंद्रासाठी मदत

केरळमधील पेरियार नदीवर धरण बांधून वीज निर्माण करण्याची योजना आखण्यांत आलेली आहे. ह्या योजनेसाठी ५० कोटी रुपये खर्च येणार असून ती पूर्ण झाल्यावर ८ लाख किलोवॅट वीज निर्माण होऊं लागेल. केरळ राज्यांतील ही एक मोठी जलविद्युत् योजना आहे. योजनेच्या पूर्तीसाठी लागणारी सर्व रक्कम कॅनडाकडून मिळण्याची शक्यता आहे.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्यें व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमचीं वैशिष्ट्यें —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचें भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्म-शताब्दि दिनीं लोकमान्यांचें सरदारगृहांत केलेलें स्मारक.

फोन नं. :–३८३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार–सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केट जवळ, मुंबई २.




वेडेकर
मसाले, लोणचीं व पापड
आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.
वापरून पाहा.
ठाकुरद्वार... गिरगाव
फुगभाट, मुंबई ४.
शाखा : ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७१९००

बचतीच्या आकर्षक योजना

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | „ ३। „ |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | „ ५ „ |

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः—युवरबँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :—०·५० टक्के.  सेव्हिंग्ज् बँक :—३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष—४¼ टक्के, २ वर्षे—४½ टक्के, ३ वर्षे—४¾ टक्के,
४ वर्षे—५ टक्के, ५ वर्षे—५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा—विस्तार

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर—मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मधूर, १८. उंबज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| गंगाजळी | रु. | ५,६६,००० |
| ठेवी | रु. | ३,३५,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ३,५०,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. चेअरमन.



## आपण कोणीहि असा

तुमच्याकरितां कांहीं ना कांहीं आम्ही करूं शकूं. बचत करावी असें तुम्हांला वाटत असणारच. आपल्याकडे सुरक्षितपणें ती कशी गुंतवावी याची विवंचना लागणारी असेल तर तो हेतु आमच्याकडील मुदतबंद ठेवीनें साध्य होऊन आपणांस मुदतीनुसार ५ टक्क्यांपर्यंत त्यावर व्याज मिळत राहील. तसेंच अगदीं मासिक किंवा ठराविक हप्त्यानें अगदीं ५–१० रुपयेसुद्धां वांचवून बचत वाढतच राहील अशी क्युम्युलेटिव्ह योजनाहि येथें आहे. ठेवी, कर्जे, वसुली, कर्जरोखे (शेअर्स) इत्यादींची खरेदी–विक्री, बँक गॅरंटी, सेफ डिपॉझिट व्हॉल्ट, जिन्नस व कागदपत्रांची बंदिस्त देखभाल, इत्यादि हरतऱ्हेचे व्यवहार आपण निः-संकोचपणें येथें करूं शकतां. महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांमध्यें आपल्या २८ शाखांतर्फे जनतेची अहर्निश सेवा बजावित असलेल्या या बँकेच्या कोणत्याहि शाखेला अधिक माहिती-साठी भेट द्या.

## —दि बेळगांव बँक लिमिटेड—

( शेड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस—रविवार पेठ, बेळगांव.

स्थापना—१९३०

बी. बी. पोतदार, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

ए. आर. नाईक, बी. ए., बी. एस्सी., एलएल. बी., मॅनेजिंग डायरेक्टर



दूरध्वनि : २२४८३.  तार : सेंको बँक

## पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ—पुणें शहर.

**व्याजाचे नवीन आकर्षक दर—**

| | | | |
|---|---|---|---|
| चालू ठेव | ... | ... | १/४ टक्के |
| सेव्हिंग्ज | ... | ... | ३ टक्के |

**कायम ठेव—**

| | | | |
|---|---|---|---|
| १ महिना | ... | ... | ३·३७ टक्के |
| ३ महिने | ... | ... | ३·५० टक्के |
| ६ महिने | ... | ... | ३·७५ टक्के |
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षे | ... | ... | ४·२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर | ... | ... | ४·५० टक्के |

**याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.**

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या.*
*सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

वा. ग. अळतेकर,
बी. कॉम.
कार्यकारी संचालक.



## महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड, मुंबई

[ दि विदर्भ सहकारी बँक लि. सम्मीलित ]

: मुख्य कचेरी :
१, बेक हाऊस लेन, फोर्ट मुंबई.
टेलिफोन नं. २५५४७४–७५. ३८३११.

: विभागीय कचेरी :
महाल : नागपूर.
तारेचा पत्ता : फार्मर बँक

: बृहन्मुंबईतील शाखा :

(१) भायखळा (२) गोरेगांव (३) खार (४) लालबाग (५) प्रभादेवी (६) विलेपार्लें (७) सांताक्रूझ (८) मुलुंड (९) चेंबूर.

चेअरमन : प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैसा शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखर कारखाने यांच्याच उपयोगासाठीं दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ३ कोटी ८७ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी ०५ लाख |
| ठेवी | ... | २५ कोटी ४८ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ६१ कोटी ६१ लाख |

महाराष्ट्र राज्यांत सर्वत्र शाखा व संलग्न बँका आहेत.

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें, वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें,